# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

केसरी पुणे, २० डिसेंबर २०१७ ३

### राजगुरु महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र

राजगुरुनगर, (वार्ताहर) : गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ डिसेंबर रोजी 'वाणिज्य, बँकिंग व व्यवस्थापन क्षेत्रातील नवीन प्रवाह' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्या हस्ते आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. चर्चासत्रात डॉ. प्रमोद बियानी, डॉ. हंसराज थोरात, डॉ. के. एन. बदले आणि सी. ए. निलय मेहता आदी तज्ज्ञ मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहे. चर्चासत्राच्या समारोप संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, समन्वयक डॉ. एच. एम. जरे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सकाळ ७

### विद्यार्थ्यांनी ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करावी

#### डॉ. एन. एस. उमरानी यांचे आवाहन; राजगुरुनगरमध्ये चर्चासत्र

राजगुरुनगर, ता. २१ : "विद्यार्थ्यांनी भांडवलापेक्षा बुद्धिमत्तेचा वापर करून नवी ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करावी," असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमरानी यांनी नुकतेच येथे केले.

गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने राजगुरुनगर येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या 'वाणिज्य, बँकिंग व व्यवस्थापन क्षेत्रातील नवीन प्रवाह' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमरानी.

डॉ. उमरानी म्हणाले, "जागतिकीकरणाच्या धोरणामुळे आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बदलांनी शिक्षणासह लोकांची सर्व क्षेत्रे व्यापली आहेत. त्यामुळे कौशल्याधारित शिक्षणाला महत्त्व आले आहे. ओला, उबरसारख्या कंपन्या कुठलीही भांडवली गुंतवणूक न करता, केवळ तंत्रज्ञानाच्या साह्याने व्यवस्थापन करून सार्वजनिक वाहतूक सेवा व दूध डिलिव्हरी क्षेत्रात रोजगार व महसूलनिर्मिती करीत आहेत. विद्यार्थ्यांनीही पारंपरिक शिक्षण घेताना मळलेल्या वाटा सोडून स्वतःचा नवा मार्ग निर्माण करावा."

चर्चासत्राचे समन्वयक डॉ. एच. एम. जरे यांनी प्रास्ताविक केले. धनंजय वाटेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गणेश भुजबळ यांनी आभार मानले.

पुणे जिल्हा उत्तर ७ पुढारी पुणे, रविवार २४ डिसेंबर २०१७



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात बोलताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमरानी.

# ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करा : डॉ. उमरानी

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षण घेताना मळलेल्या वाटा सोडून नवा मार्ग निर्माण करावा. भांडवलाऐवजी बुद्धिमत्तेचा वापर करून ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करावी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमरानी यांनी केले.

गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित वाणिज्य, बँकिंग व व्यवस्थापन क्षेत्रातील नवीन प्रवाह या विषयावरील राज्यस्तरीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. उमरानी म्हणाले की, १९९१ नंतर आलेल्या जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बदलांनी शिक्षणासह जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापली आहेत. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर मनोरंजनासाठी न करता ज्ञानप्राप्तीसाठी करून कौशल्याधारित शिक्षणासाठी तयार राहावे.

या परिसंवादात सहभागी झालेल्या ८५ संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हिरामण सांडभोर, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी प्रास्ताविक केले. धनंजय भालेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गणेश धुमाळ यांनी आभार मानले.

केसरी पुणे, २४ डिसेंबर २०१७


# 'ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करा'




राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य, बँकिंग व व्यवस्थापन क्षेत्रातील नवीन प्रवाह या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभागी झालेल्या संशोधकांच्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन डॉ. एन. एस. उमराणी व अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. (छायाचित्र : किरण खुडे)

## उपकुलगुरू डॉ. उमराणी यांचे आवाहन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : विद्यार्थ्यांनी रुळलेल्या वाटा सोडून स्वतःचा नवा मार्ग निर्माण करावा त्यासाठी भांडवलापेक्षा बुद्धिमत्तेचा वापर करून नवी 'नॉलेज इकॉनॉमी' म्हणजेच 'ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था' निर्माण करावी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन.एस.उमराणी यांनी केले. ते गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित वाणिज्य, बँकिंग व व्यवस्थापन क्षेत्रातील नवीन प्रवाह या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच.एन.जरे, प्रा. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

डॉ. उमराणी पुढे म्हणाले, जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बदलांनी शिक्षणासह जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापली आहेत. बदलत्या काळात कौशल्याधारित शिक्षणाला महत्त्व आहे ओला, उबरसारख्या कंपन्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व पुढे डिलिव्हरी क्षेत्रात सहभाग घेऊन रोजगार व महसूल निर्मितीत योगदान देत आहेत. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर ज्ञानप्राप्तीसाठी करून कौशल्याधारित शिक्षणासाठी तयार राहावे, असेही ते म्हणाले.

संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी माहिती तंत्रज्ञानातील बदलामुळे बँकिंग क्षेत्रात ई, नेट, मोबाईल बँकिंग असा बदल झाल्यामुळे कॅशलेस इकॉनॉमी आकाराला येत असल्याचे सांगितले.

चर्चासत्रातील ८५ संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन डॉ. उमराणी व अॅड. बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. चर्चासत्राचे आयोजन उपप्राचार्य डॉ.एच.एन.जरे, प्रा.जी.एन.घुमाळ, प्रा.पायल ओसवाल, प्रा.एस.ए.वीर, प्रा.एस.पी.बोऱ्हाडे, प्रा. टी.बी.येवले, प्रा.पी.एस.सांडभोर, प्रा.आर.एन.दालट, प्रा.पी.आर.आसवले, प्रा.आर.एन. कातोरे, प्रा.एच.एस.चौधरी, प्रा.एस.एस.थोरात, प्रा.आर.आर.डोके यांनी केले. सूत्रसंचालन धनंजय वाटेकरने केले.

लोकमत
हॅलो पुणे
पुणे, रविवार, दि. २४ डिसेंबर २०१७ | ८

# ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था हवी : उमराणी

लोकमत न्यूज नेटवर्क



'बँकिंग व व्यवस्थापन क्षेत्रातील नवीन प्रवाह' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्रात बोलताना डॉ. एन. एस. उमराणी.

◆ वस्तू व सेवा करामुळे एकूण करप्रणालीत झालेला सकारात्मक बदल तसेच नोटाबंदीमुळे अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांचा आढावा त्यांनी घेतला. डॉ. विजय मेहता यांनी वस्तू व सेवा कर, डॉ. एस. डी. चौधरी यांनी व्यवस्थापनातील बदलते प्रवाह आणि डॉ. के. एन. काळे यांनी 'अर्थव्यवस्थेतील बदलते स्वरूप' या विषयावर विवेचन केले. या चर्चासत्रात सहभागी झालेल्या ८५ संशोधकांच्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन उमराणी व झुंबरपाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

राजगुरुनगर : विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षण घेताना मळलेल्या वाटा सोडून स्वत:च्या नवा मार्ग निर्माण करावा. त्यासाठी भांडवलापेक्षा बुद्धिमत्तेचा वापर करून नवी नॉलेज इकॉनॉमी म्हणजेच ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करावी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी केले.

हे गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित वाणिज्य, बँकिंग व व्यवस्थापन क्षेत्रातील नवीन प्रवाह या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, हरिभाऊ सांडभोर, कोंडीभाऊ टाकळकर, बाबासाहेब सांडभोर, अंकुश कोकेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. एच. एम. जरे, प्रा. डी. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कैलास पाचारणे, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

उमराणी म्हणाले, की १९९१ नंतर आलेल्या जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बदलांनी शिक्षणासह जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापली आहेत. बदलत्या काळात कौशल्याधारित शिक्षणाला महत्त्व आले आहे. भीमा नदीपात्रातील जल प्रदूषण व जलपर्णीवर करीत असलेल्या संशोधनाबद्दल प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करताना त्यांनी प्रत्येकाने देशाच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन केले.

देवेंद्र बुट्टेपाटील यांनी माहिती तंत्रज्ञानातील बदलांमुळे बँकिंग क्षेत्रात ई-बँकिंग, नेट-बँकिंग, मोबाईल-बँकिंग असा सकारात्मक बदल झाल्यामुळे कॅशलेस इकॉनॉमी आकाराला येत असल्याचे सांगून दिल्लीमध्ये आयसीआयसीआय बँकेने स्वयंचलित शाखा सुरू केल्याचे सांगितले. या बदलांना स्वीकार सर्व संस्था व व्यवस्थापनांनी करायला हवा. तसेच नवीन तंत्रज्ञान वापरून काम करणार असल्याचे या बदलाला आपण सामोरे जायला हवे असे ते म्हणाले. या चर्चासत्राचे आयोजन उपप्राचार्य व समन्वयक डॉ. एच. एम. जरे, प्रा. जी. एम. धुमाळ, प्रा. पी. पी. ओसवाल, प्रा. एस. ए. बी., प्रा. एस. पी. सोनवणे, प्रा. टी. बी. घेवडे, प्रा. पी. एस. सांडभोर, प्रा. आर. एम. टोपर, प्रा. पी. आर. आवटे, प्रा. आर. एन. काळोरे, प्रा. एच. एस. चौधरी, प्रा. एस. एस. थोरात, प्रा. आर. आर. रोडे यांनी केले. चर्चासत्राचा समारोप डॉ. के. एन. काळे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांच्या उपस्थितीत झाला.

पुणे जिल्हा उत्तर ७ पुढारी पुणे, रविवार २४ डिसेंबर २०१७



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात बोलताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमरानी.

# ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करा : डॉ. उमरानी

राजगुरुनगर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षण घेताना रूळलेल्या वाटा सोडून नवा मार्ग निर्माण करावा. भांडवलापेक्षा बुद्धिमत्तेचा वापर करून ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण करावी, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमरानी यांनी केले.

गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित वाणिज्य, बँकिंग व व्यवस्थापन क्षेत्रातील नवीन प्रवाह या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. उमरानी म्हणाले की, १९९१ नंतर आलेल्या जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बदलांनी शिक्षणासह जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापली आहेत. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर मनोरंजनासाठी न करता ज्ञानप्राप्तीसाठी करून कौशल्याधारित शिक्षणासाठी तयार राहावे.

या चर्चासत्रात सहभागी झालेल्या ८५ संशोधकांच्या शोधनिबंधाचा समावेश असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक कोडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, अंकुश कोळेकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आणि संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी प्रास्ताविक केले. धनंजय वाडेकर याने सूत्रसंचालन केले. प्रा. गणेश घुमाळ यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख